ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत
किमान १० % लोकसहभाग प्राप्त करुन
घेण्याची पध्दत घालून देणे व योजनेचे
प्राधान्य निश्चित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकःग्रापापु १००४/प्र.क्र.२४४/पा.पु.०७

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १८ जानेवारी, २००५

वाचाः शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु १००२/प्र.क्र.५३२/पा.पु.०७,
दिनांक २३ मार्च, २००२

## प्रस्तावनाः

उपरोक्त शासन परिपत्रक दिनांक २३ मार्च, २००२ अन्वये नव्या मागणी आधारित समूह सहभागाच्या ग्रामीण पाणी पुरवठा धोरणाअंतर्गत पाणी पुरवठा सुविधांची मागणी ग्राम पंचायती /गावांकडून प्राप्त झाल्यावर पाण्याची सोय नसलेल्या, पाणी टंचाईग्रस्त, अडचणीच्या व गरजू गावांना प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देता यावा, तसेच अशा अडचणीच्या गावापैकी ज्या गावांत आदिवासी, मागासवर्गीय, दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची लोकसंख्या जास्त आहे त्यांना प्राधान्यक्रम मिळावा, शिवाय अशी कामे लोकसहभागातून करुन घेण्याची संस्कृती ज्या गावांत रुजत आहे ती गावे विशेषत्वाने निवडण्यात यावी यादृष्टीने गावाना निधी उपलब्ध करुन देण्याचे प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी १०० गुणांची निकष यादी उपरोक्त नमूद शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आली होती.

२. परंतु, क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून माहिती घेता असे निदर्शनास आले आहे की, या १०० गुणांच्या निकष यादी मध्ये पाणी टंचाई व पाण्याची गुणवत्ता या दोन निकषांना फक्त ५० गुण उपलब्ध आहेत तर इतर निकषांनाही समान ५० गुण देण्यात येत असल्याने बरेचदा कठीण गावांची निवड होत नाही. कारण टंचाई व अयोग्य पाणी गुणवत्ता याबाबतीत गावे कठीण किंवा अडचणीची नसली तरी उर्वरित निकषांमध्ये त्यांना जादा गुण मिळाल्यास त्यांचा प्राधान्यक्रम कठीण गावा पेक्षा कधी कधी वरचा ठरतो.

३. निकष निश्चित करताना टंचाईग्रस्त व पाणी गुणवत्ता बाधीत गावांना निश्चितच प्राधान्याने विचारात घ्यावे, मात्र अशा प्राधान्यक्रमाने घ्यावयाच्या गावामध्ये सुध्दा प्राधान्यक्रम निश्चित करताना अशा कठीण गावापैकी ज्या गावांत दारिद्रयरेषेखालील कुटुंबे, आदिवासी व मागासवर्गीयांचे प्रमाण जादा आहे त्यांना आणखी जादा प्राधान्य मिळावे, तसेच नव्या समूह सहभाग पध्दतीने काम करण्याची गावाची क्षमताही विचारांत घ्यावी यादृष्टीने गुणांचे विभाजन करण्यात आले होते. परंतु हे सर्व निकष एकत्रित, एकाच पातळीवर विचारात घेतल्याने हा उद्देश पूर्णत: सफल होत नाही असे दिसून आले आहे.

४. यासाठी सदर निकषाप्रमाणे गावांची प्राधान्य यादी तयार करण्याच्या पध्दतीत उचित बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :

प्रस्तावनेत नमुद केलेल्या बाबीचा विचार करुन शासनपुढील आदेश देत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जिल्हा परिषदांकडे गावांकडून प्राप्त झालेल्या मागणीची प्राधान्य यादी तयार करताना यापुढे खालील पध्दत अवलंबिण्यात यावी :-

(१) वर्तमानपत्रातून खुल्या जाहिरातीव्दारे व इतर पारदर्शक पध्दतीने ग्राम पंचायत/गावांकडून प्राप्त झालेल्या अर्जात प्रथम उपरोक्त शासन परिपत्रक, दिनांक २३ मार्च २००२ मधील परिच्छेद-८ मधील निकष क्र.१ व २ या पाणी उपलब्धता व पाणी गुणवत्ता या दोन निकषांना आता पूर्वीच्या अनुक्रमे प्रत्येकी २५,२५ ऐवजी पाणी उपलब्धता या निकषाला ३५ गुण व पाणी प्रतीला २५ गुण असे दोन्ही मिळून एकूण ६० गुण राहतील. यापैकी पाणी उपलब्धततेसाठी जे १० गुण आता वाढविले आहेत ते जी गावे टँकरग्रस्त आहेत त्यांना खालीलप्रमाणे वाढवून देण्यात यावे.

| | |
|---|---|
| १) सतत ५ वर्षापेक्षा जादा काळ टँकरने पाणी पुरवठा केला असल्यास - | १० गुण |
| २) सतत २ वर्षाचेवर पण ५ वर्षापर्यंत टँकरने पाणी पुरवठा केला असल्यास | ५ गुण |
| ३) सतत २ वर्षे टँकरने पाणी पुरवठा केला असल्यास | ३ गुण |

याप्रमाणे या दोन गुणनिकषाप्रमाणे प्रथम ६० पैकी गुण देऊन पहिली प्राथमिक गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी. जेवढया ग्राम पंचायती/गावे निवडावयाची आहेत त्यांच्या पेक्षा कमी ग्रामपंचायत/ गावांनीच अर्ज केला असल्यास व सदरील गावांत ठरलेल्या शासकीय निकषापेक्षा कमी प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे अथवा त्या गावांत पाणी प्रत अयोग्य आहे याची उपलब्ध सर्वेक्षणाच्या (वस्त्यांचे २००३-०४ मध्ये झालेले सर्वेक्षण व पाणी प्रतीचे राजव्यापी सर्वेक्षण) आधारे व इतर माध्यमातून स्वतंत्ररीत्या खात्री करुन घ्यावी व अशा निकषांत बसणाऱ्या सर्व गावांना मिळालेल्या गुणांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करुन त्यांची प्राथमिक गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी.

(२) जर अंतिमतः निवड करावयाच्या ग्रामपंचायती/गावांपेक्षा प्राथमिक गुणवत्ता यादीतील समाविष्ट अर्जदार गावांची संख्या जास्त असल्यास प्रथम वर नमूद केल्याप्रमाणे निकष १ व २ नुसार जी प्राथमिक गुणवत्ता यादी तयार झाली असेल त्या यादीपैकी जेवढया ग्रामपंचायती/गावांची अंतिम निवड करावयाची आहे त्याच्या दुप्पट संख्ये पर्यंतची गावे गुणानुक्रमाने वेगळी करावी . दुपटीपेक्षा जास्त गावे/ग्रामपंचायती यादीत नसलेस सर्वांचाच अंतिम यादीसाठी विचार करावा.

(३) मात्र आता निकष ३ ते ८ पैकी निकष क्रमांक ३ ला (दारीद्रयरेषेप्रमाणे) १० ऐवजी ५ गुण व निकष क्र.८ ला (भूजल कायदा अंमलबजावणी ) १० ऐवजी ५ गुण द्यावे. म्हणजे एकूण गुण १०० च राहतील व टंचाई व पाणी प्रत सोडून इतर ३ ते ८ निकषांचे वेटेज/गुण ४० होईल. सोबत गुणाचे सुधारित परिशिष्ट - अ जोडले आहे.

(४) या वरील अट क्र (२) प्रमाणे निवडलेल्या गावांना निकष ३ ते ८ नुसार पुन्हा स्वतंत्रपणे ४० पैकी गुण देऊन त्यांची अंतिम गुणवत्ता यादी तयार करावी.

(५) यापैकी जेवढया गावांना अंतिम निवडावयाचे आहे तेवढया गुणांनुक्रमांका पर्यंत गावांची निवड करावी. यामुळे कठीण गावे व त्यातही कठीण गांवात जेथे मागासवर्गीय, आदिवासी, दारिद्रयरेषेखालील व्यक्ती जादा प्रमाणावर आहेत, तसेच ज्या गांवात सामूहिक कार्यक्रम अंमलबजावणीची संस्कृती काही प्रमाणात निर्माण झाली आहे त्याच गावांना स्पर्धात्मक प्राधान्यक्रम मिळेल.

(६) याबाबतचे एक नमुना उदाहरण सोबतच्या **परिशिष्ट ब** मध्ये जोडले आहे.

२. तरी याप्रमाणे यापुढे गावांचा प्राधान्यक्रम निश्चित करताना या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे दोन स्तरीय पध्दतीचा अवलंब करावा.

३. शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु १००२/प्र.क्र.५३२/पा.पु.०७, दिनांक २३ मार्च, २००२ अन्वये दिलेल्या ग्रामपंचायत / गावे निवडीच्या इतर सूचना कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुधीर ठाकरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
७. मा. मुख्यसचिव
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१६. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१७. तहसीलदार (सर्व)
१८. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१९. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२२. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
२६. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२७. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
३०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३१. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

# परीशिष्ट --अ

| अ. क्र. | निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दत | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| १. | (अ)लाभधारकांना होणारे पाणी पुरवठयाचे सध्याचे प्रमाण. | २५ गुण | १. गावात शासकीय पाणी पुरवठा योजना नाही अथवा पूर्णपणे बंद असून सुरु करता येण्यापलीकडे आहे. | २५ गुण |
| | | | २. गावात शासकीय पाणी पुरवठा योजना आहे. परंतु त्यातुन मिळणारा पाणी पुरवठा :- | |
| | | | अ) ०- १० लिटर | २० गुण |
| | | | ब) ११ - २० लिटर | १५ गुण |
| | | | क) २१- ३० लिटर | १० गुण |
| | | | ड) ३१- ४० लिटरपेक्षा कमी | ५ गुण |
| | | | ठ) ४० लिटर व त्याचे वर | ० गुण |
| | (ब) पाणी टंचाई असल्याने टैंकर लावावी लागणारी गांवे | १० गुण | १)सतत ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे टैंकरव्दारे पाणी पुरवठा होत असलेली गावे | १० गुण |
| | | | २) सतत २ वर्षा पेक्षा जास्त पण ५ वर्षोपर्यंत टैंकरव्दारे पाणी पुरवठा होत असलेली गावे | ५ गुण |
| | | | ३) सतत २ वर्षे टैंकरव्दारे पाणी पुरवठा होत असलेली गावे | २ गुण |
| २. | पाणी प्रत<br>अ) नैसर्गिक | २५ गुण | नैसर्गिक | |
| | | | १) फ्लोराईड /आर्सेनिक यांनी बाधित स्त्रोत | २५ गुण |
| | | | २) नायट्रेट किंवा मचुळपणाने बाधित स्त्रोत | २० गुण |
| | | | ३) शिशामुळे बाधित स्त्रोत | १५ गुण |
| | | | ४) इतर हानिकारक खनिज किंवा आरोग्यास धोकादायक बाबी. | १० गुण |
| | ब) मानवनिर्मित, औद्योगिक किंवा शहरी सांडपाण्यामुळे पाण्याची प्रत बिघडणे (यामध्ये गावाचा प्रत्यक्ष दोष नाही अशा कारणांचा अंतर्भात होईल.) | | मानवनिर्मित<br>गावालगतच्या स्त्रोतात प्रयोगशाळेच्या पृथक्करणानुसार प्रदुषण विहित प्रमाणापेक्षा अधिक असल्यास व स्त्रोत पिण्यासाठी वापरणे शक्य नसल्यास व त्यामुळे दुरुन पाणी आणावे लागत असल्यास | ५ गुण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | योजनेच्या कार्यक्षेत्राच्या गावातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण (टक्केवारी ) | गुण ५ | १) जिल्हा सरासरीएवढी टक्केवारी<br>२) जिल्हा सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक टक्क्याला १ गुण मात्र कमाल गुण मर्यादा । जिल्हा सरासरीपेक्षा ५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास कमाल ५ गुणांवर सिमित करावे.<br>३) जिल्हा सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास प्रत्येक पूर्ण १ टक्के कमी सर ासरीसाठी १ गुण कमी करण्यांत यावा. जिल्हा सरासरीपेक्षा ५ %किंवा त्यापेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | २ गुण<br>३ ते कमाल ५ गुण<br>१.५ ते ० पर्यंत गुण |
| ४. | मागासवर्गीयांचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी) | १० गुण | १) राज्य सरासरी एवढी टक्केवारी<br>२) राज्य सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण् टक्क्याला १ गुण मात्र कमाल गुण मर्यादा (५ टक्के किंवा जास्त टक्केवारी असल्यास) १० गुणांची राहील.<br>३) राज्य सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास प्रत्येकी १ टक्का कमी सर ासरीसाठी १ गुण कमी करण्यांत यावा. ५ % किंवा त्यापेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यांत यावे | ०२ गुण<br>०३ ते कमाल १० गुण<br>१.५ ते ० पर्यंत गुण |
| ५. | आदिवासींचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी ) | १० गुण | १) राज्य सरासरी एवढी टक्केवारी<br>२) राज्य सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण मात्र कमाल गुण मर्यादा ( ५ टक्के किंवा जास्त टक्केवारी असल्यास )१० गुणांवर सिमित राहील.<br>३) राज्य सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास प्रत्येकी १ टक्का कमी सर ासरीसाठी १ गुण कमी करण्यांत यावा. ५% किंवा त्यापेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यांत यावे. | ०५ गुण<br>०६ ते कमाल १० पर्यंत गुण<br>०४ ते ० पर्यत गुण |
| ६. | गावातील पूर्वीची पाणीपट्टी वसुली | १० गुण | १) ९० ते १०० टक्के वसुली<br>२) ७५ ते ८९ टक्के वसुली<br>३) ६० ते ७४ टक्के वसुली<br>४) ५० ते ५९ टक्के वसुली<br>५) ५० टक्के पेक्षा कमी वसुली | १० गुण<br>०७ गुण<br>०५ गुण<br>०२ गुण<br>०० गुण |
| ७. | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत बक्षीस मिळाले असल्यास. | ५ गुण | १) विभाग किंवा राज्य स्तर ावरील बक्षिस मिळाले असल्यास.<br>२) जिल्हा स्तरावरील बक्षीस मिळाले असल्यास<br>३) पंचायत समिती स्तर ावरील बक्षीस मिळाले असल्यास<br>४) जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील प्रथम तीन पैकी क्रमांक मिळाला असल्यास.<br>५) कोणतेही बक्षीस किंवा प्राधान्य क्रमांक नाही. | ०५ गुण<br>०४ गुण<br>०३ गुण<br>०१ गुण<br>०० गुण |



D:\New Folder\Statement Gunakan.doc १५ १ ०५

एच–855 –3अ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | भूजल कायदा व पाणी वाटपाबाबत गाव सहभाग. | ५ गुण | १) गावाने स्वयंनियोजन करुन त्याप्रमाणे कार्यवाही केली असल्यास<br>२) शिवकालीन पाणी साठवण योजनेप्रमाणे केवळ नियोजन केले असल्यास.<br>३) अंमलबजावणी/नियोजन केले नसल्यास | ०५ गुण<br>०२ गुण<br>०० गुण |

टिप :- गावाने शासनाने ठरविलेल्या किमान दराने किंवा त्या दरापेक्षा जास्त दराने पाणीपट्टी आकार लेली असावी, तरच क्र. ६ च्या निकषाखाली द्यावयाचे गुण प्राप्त होतील.

# परिशिष्ट "ब "

समजा अ, ब, क, ड, इ, फ या ६ ग्रामपंचायती /गावांनी पिण्याचे पाणी पुरवठा योजनेसाठी वर्तमान पत्रात किंवा इतर प्रसिध्दी माध्यमातून आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने संपूर्ण माहितीसह जिल्हा परिषदेकडे अर्ज सादर केला आहे.

समजा त्यांना परिशिष्ट- अ मध्ये नमूद केलेल्या सुधारित निकषानुसार निकषा अंतर्गत मिळालेल्या गुणांची संख्या खाली नमूद केल्याप्रमाणे आहे.

**टेबल क्र.१ -**

| अर्जदार गाव/ ग्रामपंचायत | निकष १ ते २ (पाण्याची गरज) अंतर्गत मिळालेले गुण (कमाल गुण ६०) | निकष ३ ते ८ | | | एकूण प्राप्त गुण (२ +३ (क)) | गुणानुक्रम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ सामाजिक न्याय (निकष ३ ते ५) (कमाल गुण २५) | ब समूह कार्य संस्कृती (निकष ६ ते ८) (कमाल गुण १५) | क एकूण (अ +ब ) (कमाल गुण ४०) | | |
| (१) | (२) | (३) | | | (४) | (५) |
| अ) | ५५ | ५ | ५ | १० | ६५ | २ |
| ब) | १५ | ३० | १० | ४० | ५५ | ४ |
| क) | ४० | १५ | ५ | २० | ६० | ३ |
| ड) | ३५ | २० | १५ | ३५ | ७० | १ |
| इ) | २० | १० | २० | ३० | ५० | ५ |
| फ) | ३० | १० | ५ | १५ | ४५ | ६ |

वरील प्रमाणे सर्व निकषांची एकत्रित बेरीज केल्यास पाण्यासाठी सगळयात गरज असलेले गाव/ग्रामपंचायत (अ)ही दुसऱ्या क्रमांकावर येते तर विशेष पाणी टंचाई नसलेले गांव(ब) हे चौथ्या क्रमांकावर येते,मात्र (ब) गावांपेक्षा जादा टंचाईची गांवे म्हणजे क, ड, इ, फ ही गुणानुक्रमाने (ब) च्या वर किंवा खाली जातात. निकषांचा एकत्रित विचार करुन गुणानुक्रम दिल्याने ही परिस्थिती उद्‌भवते म्हणून गुणानुक्रम लावताना आता खालीलप्रमाणे पध्दत अवलंबावी :

## सुधारित पध्दतः

सुधारित पध्दतीत प्रथम सर्व गावांची निकष १ व २ नुसार गुण देवून यादी करावी व प्राथमिक गुणानुक्रम देण्यात यावा. ती यादी खालीलप्रमाणे तयार होईल :-

**टेबल क्र.२ -**

| गावाचे/ग्रामपंचायतीचे नांव | निकष १ व २ नुसार प्राप्त गुण | गुणानुक्रम |
|---|---|---|
| अ) | ५५ | १ |
| ब) | १५ | ६ |
| क) | ४० | २ |
| ड) | ३५ | ३ |
| इ) | २० | ५ |
| फ) | ३० | ४ |

वरीलप्रमाणे गुणानुक्रम लावतांना सगळयात पाणी टंचाईग्रस्त ग्रामपंचायत /गाव (अ) याला वरचा क्रमांक व सगळयात कमी टंचाईग्रस्त ग्रामपंचायत/ गाव (ब) याला खालचा क्रमांक मिळालेला आहे. परंतु पाणी टंचाई बरोबर दारिद्रय रेषेखालील, मागासवर्गीय व आदिवासींचे ग्रामपंचायत /गावातील प्रमाण जास्त असणाऱ्या गावांना प्राधान्य द्यावयाचे आहे. तसेच हा प्रकल्प मागणी आधारित, समूह सहभाग तत्वावर असल्याने ग्रामस्थांच्या पुढाकारास विशेष महत्व असल्याने समूह सहभागाची पूर्वपिठीका विचारात घेऊन काही गुण देणे आवश्यक आहे. यासाठी वरील प्राधान्य यादीत निकष ३ ते ८ मध्ये प्राप्त होणारे गुण विचारात धेऊन त्याची पुन्हा अंतिम गुणवत्ता यादी खालीलप्रमाणे तयार होईल.

**टेबल क्र.३ ्‌**

| गावाचे नांव | ३ ते ८ निकषात प्राप्त गुण (टेबल क्र. १ मधील रकाना ३ क ) | अंतिम गुणवत्ता क्रमांक |
|---|---|---|
| अ) | १० | ६ |
| ब ) | ४० | १ |
| क) | २० | ४ |
| ड) | ३५ | २ |
| इ) | ३० | ३ |
| फ) | १५ | ५ |

समजा वरील पैकी ४ ग्रामपंचायती /गांवे निवडावयाची असल्यास गुणानुक्रमाने ब, ड, इ, क या गावांची निवड होईल. यामुळे एकीकडे बऱ्यापैकी कठीण गावांची निवड होतानाच मागासवर्गीय, दारिद्रयरेषेखालील कुटुंबे जादा असलेल्या ग्रामपंचायतीना/गावांना व समूह सहभाग संस्कृती असलेल्या गावाना प्राधान्य मिळून समतोल साधला जाईल.

--------